## नियमित दिवाणी दावा क्र.४५/२०१४ मधील
## निशाणी ९६ वरील आदेश

१. अर्ज व म्हणणे वाचले.

२. अभिलेखातील कागदपत्रे पाहिली.

३. उभयपक्षकारांचा युक्तिवाद ऐकला.

४. वादी यांचे अर्जातील कथनांप्रमाणे प्रतिवादी क्र.१ शंकर गंगाराम डोंगरे हे दिनांक १२.०८.२०२२ रोजी मयत झाले आहेत. त्यांचे वारस ९० दिवसांच्या मुदतीत अभिलेखावर घेणे आवश्यक होते. परंतु, वादी यांना विहीत मुदतीत प्रतिवादी क्र.१ यांचे मृत्यू प्रमाणपत्र व त्यांचे वारसांची नावे व पत्ते प्राप्त करणे शक्य न झाल्याने त्यांचे विरुध्द दावा अबेटमेंटचा आदेश झाला आहे. वादी यांनी प्रतिवादी क्र.१ यांचे वारस प्रकरणात समाविष्ट करण्यास मुद्दामहून व जाणूनबुजून विलंब केलेला नाही. सबब, त्यांचे विरुध्द झालेला दावा अबेटमेंटचा आदेश रद्द होवून मिळावा, अशी विनंती वादी यांनी केली आहे. प्रतिवादी यांनी या अर्जावर म्हणणे दाखल करून अर्जास हरकत घेतली आहे. परंतु, वादी क्र.१ यांनी अर्जाचे पुष्ट्यर्थ शपथपत्र सादर करुन अर्जातील कथने शपथेवर कथन केली आहेत. वादी यांनी त्यांचे अर्जामध्ये केलेली कथने पाहता त्यांनी अर्जात नमूद केलेले कारण संयुक्तिक वाटते. वादी यांनी हा दावा वाटप होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. त्यामुळे, दाव्याचे स्वरूप पाहता प्रतिवादी क्र.१ यांचे वारसांविरुध्द दाव्याचे कारण पुढे चालू राहते. प्रतिवादी क्र.१ यांचे वारस या कामी आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे, या कामी प्रतिवादी क्र.१ यांचे वारस अभिलेखावर घेणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक व जरुरीचे आहे. त्याकरीता वादी यांचे विरुध्द प्रतिवादी क्र.१ यांचे बाबत झालेला दावा अबेटमेंटचा आदेश रद्द होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक व जरुरीचे आहे. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहेः–

## आ दे श

१. वादी यांचा निशाणी ९६ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. मयत प्रतिवादी क्र.१ यांचे वारस मुदतीत अभिलेखावर न घेतल्यामुळे वादी यांचेविरुध्द झालेला दावा अबेटमेंटचा आदेश रद्द करणेत येत आहे.

–

Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2023.01.10 17:14:44 +0530

दिनांक : १०.०१.२०२३ (डी.एम.हिंग्लजकर)
ठिकाणः वडवणी दिवाणी न्यायाधीश क.स्तर, वडवणी,
ता. वडवणी, जि.बीड.

## Certificate

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/order.

Sd/-
(Amol D. Mule)
Stenographer (Grade-3)
Civil Court Junior Division
Wadwani

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 10.01.2023 |
| Transcribed on | : | 10.01.2023 |
| Checked and signed on | : | 10.01.2023 |